नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५६/१९९३
नि. १५० लगत

<u>शपथेवर सुरू</u>

<u>पुढील उलटतपास प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११,१३, १४ व १६ तर्फे वकील श्री.एस. जी.पणदुरकर यांचेतर्फे</u>

२०. सन १९९१—९२ सालात जी दावा मिळकतीची मी मोजणी केली होती त्याचा नकाशा आज मी हजर करू शकत नाही. मी दीड महिन्यापासून तो नकाशा शोधत आहे परंतु मला तो मिळाला नाही. दिनांक १६/१०/२००३ रोजीच्या खरेदीखताने जी मिळकत मी विकत घेतली ती गोविंद कृष्णाजी वाळके व. ६ यांच्या मालकी कब्जेभोग्याची मिळकत होती. गोविंद वाळके यांनी ज्यावेळी मिळकत मला विकली त्यावेळी त्यांनी त्यांची वहीवाट मला दाखवली होती. गोविंद वाळके यांनी मला नि. ९४ च्या नकाशानुसारची वहिवाट दाखवली होती. ती वहिवाट मी स्वत: पाहिली होती व खात्री केली होती. दावा मिळकतीचा मुळ गट नकाशा मी पाहिला होता की नाही हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीची तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून मी मोजणी करून घेतलेली नाही. दावा मिळकत खरेदी करण्यापूर्वी मी उपअधिक्षक भूमी अभिलेख, सावंतवाडी यांच्या कार्यालयात गेलो नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या मिळकतीलगत प्रतिवादींची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी त्यांच्या जमिनीत घरे बांधलेली आहेत. प्रतिवादींची घरे माझ्या मिळकतीच्या कोणत्या दिशेला आहेत हे मला सांगता येणार नाही.

२१. दावा मिळकतीच्या पश्चिमेला शिर्के व दक्षिणेला कोण आहे त्याचे नांव मला आठवत नाही. स.क्र. ३७९ कोणाचा आहे हे मला माहित नाही. मी स.क्र. ३७९ चा सातबाराचा उतारा मी पाहिलेला नाही. दावा मिळकतीच्या पूर्वेला कोणाची मिळकत आहे हे मला सांगता येणार नाही. नि. १९७ च्या खरेदीखतातील चतु:सिमा कोणी सांगितल्या हे मला आठवत नाही. स.क्र. ३२१ चा नविन स.क्र. २२७ कसा झाला याबाबतचा कागद मी दाव्यात दाखल केला की नाही हे मला आठवत नाही. मी रेदिमुक्र. १३/१९२०—२१ हा दावा कोणी दाखल केला व त्याचा निकाल काय लागला याबाबत मला माहिती नाही. मला मोडी लिपि वाचता येत नाही. नि. १८६ चे मराठी भाषेतिल लिप्यांतर आम्ही करून घेतलेले नाही. दावा मिळकतीलगत असलेले श्री. सावंत यांच्याविरूध्द कृष्णाजी वाळके यांनी दावे दाखल केले होते व ते दावे वाळके यांच्याविरूद निकाली झाले हे मला माहित नाही. प्रतिवादींच्या जमिनीचे पूर्वीचे मालक कोण होते हे मला माहित नाही. त्या मिळकतीचे पूर्वीचे मालक भालचंद्र सबनिस होते हे मला माहित नाही. मी दावा मिळकतीचे बोटखत व आकारफोड पत्रक पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, हि.क्र. १अ ही मिळकत कोठून सुरू होवून कोठे संपते, हि.क्र. १ब हि मिळकत कोठून सुरू होवून कोठे संपते व हि.क्र. १क ही मिळकत कोठून सुरू होवून कोठे संपते हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, हि.क्र. १अ ते १क यांच्या हद्दी दाखवणारा नकाशा प्रत्यक्ष जागेवर जावून तयार झालेला नाही. उपअधिक्षक भूमी अभिलेख यांच्या कार्यालयातूनसुध्दा हि.क्र. १ अ ते १क यांच्या हद्दी दाखवणारा गटाचा नकाशा मिळत नाही याबाबत मला माहिती नाही. मी स्वत: तशा नकाशाची कधीही मागणी केलेली नाही. मी प्रतिवादी क्र. ८ यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, ॲड. आर.एस्. गव्हाणकर यांनी गोविंद कृष्णाजी वाळके यांच्यामार्फत प्रतिवादी क्र. ८ यांस नोटीस पाठवली होती. मी प्रतिवादी क्र. १८ यांस ओळखतो. प्रतिवादी क्र. १८ हा दावा मिळकतीलगत असलेल्या जमिनीचा कुळ किंवा मालक होता. प्रतिवादी यांच्या हि.क्र.

१अ या मिळकतीचे क्षेत्र ७७ गूंठे आहे की नाही व ते क्षेत्र किती आहे हे मला माहित नाही. माझ्या शपथपत्रातील परि.क्र. ४ मध्ये हि.क्र. १अ चे क्षेत्र ७५ आर. एवढे असल्याचे कसे नमुद केले हे मला सांगता येणार नाही. हि.क्र. १क कोणाचा आहे व त्याचे क्षेत्र किती आहे हे मला सांगता येणार नाही. माझ्या शपथपत्रात नमुद असलेले क्षेत्र हे मी सातबारा उता—यावरून लिहिलेले आहे. २३/०८/२०११ रोजी माझे वकील श्री. आर.एस्.गव्हाणकर हे होते. साक्षीदार पुन्हा सांगतो की, त्यावेळी माझे वकील हे श्री. देउसकर हे होते. ॲड. देउसकर हे माझे भाउ ॲड. आर.एस. गव्हाणकर यांच्या कार्यालयात होते. माझ्या शपथपत्रातील मजकूर हा मी ॲड. देउसकर यांना सांगितला व त्यांनी लिहिला होता. स.क्र. ३२१ चे संपुर्ण क्षेत्र २ हे. ३३ गुंठे इतके होते हे मी कशाच्या आधारवर लिहिले हे मला आता सांगता येणार नाही. ते क्षेत्र मी सातबाराच्या उता—यावरून लिहिले होते.

२२. वादीचे पूर्वज कोण हे मला सांगता येणार नाही. वादीचे नांव कृष्णाजी वाळके असे होते. हे म्हणणे खरे आहे की, वाळके हे सावंतवाडी येथील वैश्यवाडा या भागात रहात होते. कृष्णाजी वाळके हे नेहमी दावा मिळकतीत जात नव्हते असे माझे म्हणणे आहे. प्रतिवादी क्र. १८ विरूध्द मी कोणती कारवाई केली नाही. वादीने त्याच्याविरूध्द कारवाई केली की नाही हे मला माहित नाही. दाव्यासोबत हजर केलेला हातनकाशा कोणी तयार केला हे मला आता आठवत नाही. मला आता तो हातनकाशा दाखवला त्यावरील स्वाक्षरी कोणाची आहे हे मला आता सांगता येणार नाही. हि.क्र. १अ प्रतिवादी क्र. १८ यांनी इतर प्रतिवादींना कधी विकली हे मला सांगता येणार नाही. मी दावा मिळकत विकत घेण्यापूर्वी प्रतिवादींनी हि.क्र. १अ ची मिळकत विकत घेतलेली आहे. मी अतिक्रमित म्हणून नमुद केलेली सात गुंठे जमिन मोजलेली नाही. प्रतिवादी क्र. १८ याने दावा मिळकतीत अतिक्रमण केलेला ०७ गुंठे भाग वादीच्या अपरोक्ष विकला याबाबत वादीने अथवा मी कोणतीही कारवाई त्यांच्याविरूध्द केलेली नाही. प्रतिवादी क्र. १ ते १७ मध्ये वाटप कधी झाले हे मला सांगता येणार नाही. दावा मिळकतीचा भाग हा प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांच्या हिश्श्यात घालण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रात प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा उल्लेख नसुन तो भाग रिक्त आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचा भाग हा प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांच्या हिश्श्यात घातला हे दाखवणारा माझ्याकडे कोणताही कागद नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते १७ या सगळयांनी त्यांच्या जागेत इमारती बांधलेल्या आहेत व तेथे ते रहातात व त्या भागाचे नांव विद्यानगर असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे एक मराठी शाळा आहे. मी त्या शाळेत एक दशावतारी नाटक २० ते २५ वर्षापूर्वी केले होते. हे म्हणणे खरे आहे की, हि.क्र. १अ मध्ये माझे पूर्वी जाणे—येणे होते व आजही मी तेथे जातो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी यांनी सन १९८८ च्या दरम्यान हि.क्र. १अ च्या मिळकतीत त्यांची बांधकामे सुरू केली होती. मी ज्यावेळेस दावा मिळकत विकत घेतली त्यावेळी प्रतिवादींनी बांधकामे पूर्ण केलेली होती व झाडे लावली होती. प्रतिवादींनी हि.क्र. १अ मिळकत ज्या खरेदीखताने विकत घेतली ते खरेदीखत रद्द करण्यासाठी अथवा त्यांचे बांधकाम पाडण्यासाठी वाळके यांनी काही प्रयत्न केले की नाही हे मला माहीत नाही.

२३. मी दावा मिळकत विकत घेतली त्यावेळी वाळके यांनी हा दावा प्रलंबित असल्याची माहिती दिली होती. या दाव्याबाबत मला संपूर्ण माहिती वाळके यांनी दिली होती. प्रतिवादींचे पुर्वीचे विधिज्ञ

श्री. गांवकर यांनी दावा मिळकतीबाबत दावा प्रलंबित असल्यामुळे कोणीही त्याबाबतचा खरेदी—विक्रीचा व्यवहार करू नये अशी नोटीस दिली होती हे मला माहित नाही. माझ्या शपथपत्रातील परि.क्र ६ मधील दावा मिळकतीची पहाणी ही मी व वाळके अशी आम्ही दोघांनीही केली होती. ती पहाणी मी कधी केली हे मला सांगता येणार नाही. दावा मिळकतीची माझ्या सरतपासातील मजकुरानुसार मी व वाळके यांनी खाजगी मोजणीदाराकडून मोजणी करून घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, सध्या दाव्यात तसा मोजणीचा नकाशा हजर केलेला नाही. मी स्वत: प्रतिवादींना दावा मिळकतीचा कब्जा देण्याची मागणी केलेल नाही. ती मागणी वाळके यांनी केली होती. परंतु त्याची तारीख मला सांगता येणार नाही. प्रतिवादींनी आम्हाला लेखी उत्तर दिलेले नाही त्याबाबत वाळके यांनीसुध्दा मला काही सांगितलेले नाही.

२४. 'विरूध्द कब्जा' म्हणजे काय हे मी नक्की सांगु शकत नाही. प्रतिवादी यांची वाळकेसोबत आपसात तडजोडीची बोलणी चालू होती व ती बोलणी माझ्यासोबत केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाळकेंनी दाव्यात जे नमुद केले तेच मी माझ्या शपथपत्रात पुन्हा नमुद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रात मी दावा मिळकत खरेदी केली याचासुध्दा उल्लेख केलेला नाही.

२५. हे म्हणणे खरे आहे की, ॲड. दिपक बाबली म्हालटकर हेसुध्दा माझे विधिज्ञ होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यांनी माझ्या खरेदीखतावर साक्षीदार म्हणून सहि केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी नि. १ सोबत दाखल केलेल्या कच्च्या हातनकाशात जो रस्ता दाखवलेला आहे त्या रस्त्याचा वापर प्रतिवादी करतात. हे म्हणणे खरे आहे की, तो रस्ता ग्रामपंचायतीकडे दिलेला आहे व त्यावर ४ ते ५ वर्षापूर्वी डांबरीकरण झालेले आहे. मी त्या रस्त्याबाबत ग्रामपंचायतीकडे कधीही हरकत घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तो रस्ता हा प्रतिवादींचा असल्यामुळे मी तशी हरकत ग्रामपंचायतीकडे घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्याच रस्त्याचा वापर प्रतिवादींनी त्यांचे घरांचे बांधकाम करण्यासाठी लागणा—या साहित्याच्या वाहतुकीसाठी केला होता. मी अथवा वाळके यांनी त्या रस्त्याचा वापर प्रतिवादीनी करू नये यासाठी हरकत घेतलेली नाही.

नि. २४० कडे दाखल केलेल्या अर्जावर म्हणणे आलेले नसल्यामुळे त्या अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रावरील उलटतपास घेण्यासाठी उलटतपास तहकुब.

श्रवणोत्तर स्विकृत.

सही/—
(एम्.एस्.बुधवंत )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सावंतवाडी.

दिनांक :— १२/०६/२०१७.